# झपाटलेला पिंपळ



भल्या सकाळी शाळेत चाललेला राजू कोपऱ्यावरून वळला आणि समोरच त्याला रिकामी बस दिसली. त्याने कसा बसा आवंढा गिळला. त्याचे हात कापायला लागले. त्याने ओझरत्या नजरेने थांब्याच्या शेजारच्या पिंपळाकडे पहिले. तो पिंपळ झपाटलेला आहे हे त्याला माहिती होते.

"कुठे आहेत सगळे?" राजू स्वतःशीच बोलला.

अजून सूर्य उगवला नव्हता. अंधारात तो पिंपळ जरा भीतीदायकच दिसत होता. त्या पिंपळापाशी सकाळी सगळी मुले जमायची आणि बस येईपर्यंत गप्पा मारायची. सगळी मुले जमल्यानंतर तो पिंपळ तितकासा भीतीदायक वाटायचा नाही. पण आत्ता राजू एकटा होता आणि तसा अंधारही होता.

पिंपळाच्या फांद्या वाऱ्यानी हालल्या. अचानक झाडातून आवाज आला - "हूsssss!"

राजू रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला पळाला. त्याला झाडापासून दूर जायचे होते. त्याने आपली नजर झाडावरून काढली नाही. झाडाच्या फांद्या जणूकाही त्याला पकडायला येत होत्या. तेवढ्यात पुन्हा एकदा आवाज आला - "हूsssss!"

"मी काही तुला घाबरत नाही." राजू थरथरत्या आवाजात म्हणाला.

"कोणाशी बोलतोयस?" मागून येत अविने विचारले.

राजू दचकलाच. पण त्याने वळून पाहिलं. अविला पाहताच त्याने निःश्वास सोडला. आता तो झाडापाशी एकटा नव्हता. अविने राजूकडे पाहत पुन्हा एकदा विचारले.

राजू म्हणाला, "मला वाटले की झाडातून कोणीतरी माझ्याशी बोलले."
"पिंपळावरचे भूत तर बोलले नसेल?" राजूच्या मागून रस्ता ओलांडत अविने विचारले.

"हूssssss हूssssss!"

राजू आणि अवि पुन्हा दचकले. तेवढ्यात झाडाच्या ढोलीत कोणीतरी हलले. "झाडात कोणीतरी आहे." राजू म्हणाला आणि पुढे वाकून तो झाडात बघायला लागला. "अरे, हे तर घुबड आहे."

"घुबड? इतका वेळ हे घुबड आवाज करत होते?" अवि म्हणाला.

राजू म्हणाला, "बहुतेक त्याला बरे नसेल. किंवा काहीतरी लागले असेल. आपण शाळेत गेल्यावर अनुराधा ताईंना सांगूयात. त्यांना निशाचर प्राण्यांबद्दल खूप माहिती आहे."

"आता तुला भीती वाटत नाही ना?" अविने विचारले.

"पिंपळातल्या भुताची नाही, पण आजच्या गणिताच्या परीक्षेची मात्र थोडी भीती वाटते आहे." राजू हसून म्हणाला.



~ केली हश्वे (अनुवाद - सुजित उपाध्ये) - त्रिवेणी मराठी शाळा

१. ही गोष्ट कुठे आणि कधी घडते आहे?

________________________________________

________________________________________

२. अविला पिंपळाबद्दल काय वाटले?

________________________________________

________________________________________

३. अनुराधाताई कोण होत्या?

अ) बस चालक आ) राजूची मोठी बहीण

इ) पिंपळावरचे भूत ई) शाळेतील शिक्षिका

४. खालील वाक्ये योग्य क्रमाने लावा.

_______ "आता तुला भीती वाटत नाही ना?" अविने विचारले.

_______ अंधारात तो पिंपळ जरा भीतीदायकच दिसत होता.

_______ पुढे वाकून तो झाडात बघायला लागला.

_______ राजू दचकलाच. पण त्याने वळून पाहिलं.

_______ त्याचे हात कापायला लागले.

५. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

कापणे, भीतीदायक, नजर, दचकणे, जणूकाही, निःश्वास, निशाचर, परीक्षा, माहिती, ओलांडणे

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________